भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०११-१२/२२**
**डीएनबीएस.पीडी.सीसी.क्र. २२८/०३.०२.००४/२०११-१२** **जुलै १, २०११**

१) सचिव, वित्त मंत्रालय
२) अध्यक्ष, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया
३) इंस्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे अध्यक्ष
४) इंस्टिट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाचे अध्यक्ष
५) एनबीएफसींचा संघ.

महोदय,

**महापरिपत्रक - आरबीआय अधिनियम १९३४ च्या तरतुदींपासून सूट**

आपणस माहितच आहे की, ह्या विषयावरील सर्व सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी, रिझर्व बँकेने ह्या विषयावर महापरिपत्रक क्र. १४८ दिले होते व ते आता जून ३०, २०११ पर्यंत अद्यावत करण्यात आले आहे. येथे नोंद घ्यावी की, ह्या महापरिपत्रकात, जोडपत्रातील, ह्या विषयाशीसंबंधित सर्व अधिसूचनांमधील सूचना एकत्रित करण्यात आल्या आहेत. हे महापरिपत्रक रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे. सुधारित महापरिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

आपली

(उमा सुब्रह्मण्यम)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

## १. प्रस्तावना

काही संस्थांना, आरबीआय अधिनियम १९३४च्या प्रकरण ३ ब च्या किंवा त्याच्या भागाच्या आवश्यकतांपासून सूट दिली जाण्याबाबत ह्या बँकेने वेळोवेळी अधिसूचना दिल्या आहेत. कार्यरीतींच्या उद्देशाने एकत्रित केलेले एक महापरिपत्रक म्हणून गरजू उपभोक्त्यांना मदत व्हावी ह्यासाठी जरी हे महापरिपत्रक तयार करण्यात आले असले तरी त्यांनी संबंधित अधिसूचनांमधील सूचना/निदेशांचा संदर्भ घेत रहावा. हे महापरिपत्रक, जोडपत्रात दिलेल्या अधिसूचनांच्या यादीवर आधारित आहे.

## २. (१) आरबीआय अधिनियम, १९३४ च्या प्रकरण ३ ब च्या तरतुदींमधून सूट गृहवित्तसंस्था

राष्ट्रीय गृहनिर्माण बँक अधिनियम, १९८७ च्या कलम २(ड) मध्ये व्याख्या केलेल्या व एक गृहनिर्माण वित्त संस्था असलेल्या अबँकीय वित्तीय कंपनीला ह्या बँकेने, आरबीआय अधिनियम १९३४[१] च्या प्रकरण ३ (ब) च्या तरतुदींपासून सूट दिली आहे.

## २.(२) मर्चंट बँकिंग कंपनी [२]

एखाद्या मर्चंट बँकिंग कंपनीला, आरबीआय अधिनियम १९३४ च्या, कलम ४५ आयए (पंजीकरण व नक्त निजनिधीची आवश्यकता), कलम ४५ आयबी (लिक्विड ॲसेट्स ठेवणे) आणि कलम ४५ आयसी (राखीव निधी निर्माण करणे) तसेच,[३] अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८ आणि [४] अबँकीय वित्तीय कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, १९९८ च्या तरतुदींपासून, पुढील अटींचे पालन केलेले असल्यास, सूट देण्यात आली आहे.

(अ) अशी कंपनी, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया अधिनियम, १९९२ च्या कलम १२ खाली, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाकडे एकमर्चंट बँकिंग कंपनी म्हणून पंजीकृत झालेली असावी. आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया मर्चंट बँकिंग (नियम) १९९२ आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया मर्चंट बँकिंग (विनियम), १९९२ अनुसार मर्चंट बँकिंगचा व्यवसाय करत असावी;
(ब) मर्चंट बँकिंग व्यवसायांचा केवळ एक भाग म्हणून ती सिक्युरिटीज मिळवत असेल.
(क) आरबीआय अधिनियम १९३४च्या कलम ४५ आय(सी) मध्ये संदर्भित असलेली अन्य कोणतीही कार्यकृती करत नसेल. आणि
(ड) अधिसूचना क्र. डीएफसी ११८/डीजी (एसपीटी) दि. जानेवारी ३१,१९९८ च्या परिच्छेद २(१)(१२) मध्ये व्याख्या केल्यानुसार सार्वजनिक ठेवी स्वीकारत किंवा धारण करीत नसेल.

## २(३) मायक्रो फायनान्स कंपन्या

पुढीलप्रमाणे असलेल्या कोणत्याही अबँकीय वित्तीय कंपन्यांना, रिझर्व बँक अधिनियम १९३४ ची ४५-आयए आणि ४५ आयसी ही कलमे लागु होणार नाहीत

[१] अधिसूचना डीएफसी (सीओसी) क्र ११२ ईडी(एसजी)/९७ ह्यासह वाचित परिपत्रक डीएफसी (सीओसी) क्र ४४३८/०२.०४/ ९६-९७ दिनांक जुन १८, १९९७
[२] अधिसूचना क्र. डीएफसी १२३ ईजी (जी)-९८ दि फेब्रुवारी ३, १९९८
[३] अधिसूचना डीएफसी (सीओसी) क्र ११८ डीजी (एसपीटी)-९८ दि जानेवारी ३१, १९९८
[४] अधिसूचना डीएफसी (सीओसी) क्र ११९ डीजी (एसपीटी)- ९८ दि जानेवारी ३१, १९९८

- जे

अ) मायक्रो फायनान्सची [५] कार्यकृती करणारी, एखाद्या व्यापारी संस्थेला रु ५०,०००/- पेक्षा अधिक कर्ज न देणारी, एखाद्या गरीब व्यक्तीला त्याचे जीवनमान व उत्पन्नस्तर वाढविण्यास मदत करण्यासाठी राहत्या घराची खरेदी करण्यासाठी रु १,२५,०००/- पेक्षा अधिक कर्ज न देणारी; आणि
ब) कंपनीज अधिनियम १९५६ च्या कलम २५ खाली परवाना असलेली; आणि
क) अधिसूचना क्र.११८/डीजी(एसपीटी)-९८ दि जानेवारी ३१, १९९८ च्या परिच्छेद २(१) (१२) मध्ये व्याख्या केल्यानुसार सार्वजनिक ठेवी न स्वीकारणारी.

**म्युच्युअल बेनिफिट कंपन्या**
पुढीलप्रमाणे असलेल्या कोणत्याही अबँकीय वित्तीय कंपनीला भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४(१९३४ चे २) कलम ४५-आयए, ४५-आयबी व ४५-आयसी लागु होणार नाही.

- अधिसूचना क्र. डीएफसी ११८/डीजी(एसपीटी)-९८ दि. जानेवारी ३१, १९९८ मध्ये दिलेल्या अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश,१९९८ च्या परिच्छेद २(१) (९अ) मध्ये व्याख्या केलेली एक म्युच्युअल बेनिफिट कंपनी. ‘म्युच्युअल बेनिफिट कंपनी’ म्हणजे कलम ६२० अ खाली अधिसूचित न केलेली कंपनीज अधिनियम १९५६(१९५६ चा १) खाली
  अ) ९ जानेवारी १९९७ रोजी अबँकीय वित्तीय कंपनीचा व्यवसाय करणारी आणि
  ब) नक्त निज निधी व प्रिफरेंशियल शेअर भांडवल रुपये दहा लक्षांपेक्षा कमी नसलेली; आणि
  क) ९ जानेवारी १९९७ रोजी किंवा त्यापूर्वी ह्या बँकेकडे पंजीकरण प्रमाणपत्र देण्यासाठी अर्ज केलेली; आणि
  ड) केंद्र सरकारने निधी कंपन्यांना दिलेल्या कंपनीज अधिनियम १९५६च्या कलम ६३७ अ खाली दिलेल्या निदेशांच्या तरतुदींमधील आवश्यकतांची पूर्तता करणारी कंपनी.

## २(४) सरकारी कंपन्या

भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४(१९३४ चा २) चे कलम ४५ - आयबी व ४५ - आयसी, अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश १९९८ चे परिच्छेद ४ ते ७, आणि अबँकीय वित्तीय कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, १९९८ (हे निदेश प्रुडेंशियल नॉर्म्स निदेश अधिसूचना क्र. १९२ दि. फेब्रुवारी २२, २००७ ने रद्द करण्यात आले आहेत.) ह्यातील पत्ता, ऑडिटर्स, संचालक इत्यादींच्या बदलाबाबतची माहिती सादर करण्याबाबतचे परिच्छेद सोडून अशी कंपनी, कंपनीज अधिनियम १९५६ च्या कलम ६१७ मध्ये व्याख्या केल्यानुसार एक सरकारी कंपनी असल्याने, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५ -आय (एफ) मध्ये व्याख्या केलेल्या कोणत्याही अबँकीय वित्तीय कंपनीला लागु होणार नाहीत. एखादी सरकारी कंपनी म्हणजे [६] ज्या कंपनीचे भरणा झालेले किमान ५१% भांडवल, केंद्र सरकार, किंवा राज्य सरकार किंवा सरकारे किंवा अंशतः केंद्र सरकार व अंशतः एक किंवा अधिक राज्य सरकारांद्वारे धारण केले आहे अशी कंपनी व त्यात अशा रितीने व्याख्या केलेल्या सरकारी कंपनीची दुय्यम कंपनीही समाविष्ट आहे.

[५] अधिसूचना क्र. डीएनबीएस.१३८/सीजीएम(व्हीएसएनएम)-२००० ह्यासह वाचित डीएनबीएस(पीडी).सीसी.क्र. १२ /०२.०१/९९-२००० दिनांक जानेवारी १३, २०००

[६] अधिसूचना क्र. डीएनबीएस. १३४, १३५, १३८/सीजीएम(व्हीएसएनएम)-२००० ह्यासह वाचित डीएनबीएस(पीडी). सीसी. क्र. १२/ ०२.०१/९९-२००० दिनांक जानेवारी १३, २०००

## २(५) व्हेंचर कॅपिटल फंड कंपन्या[७]

भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ (१९३४ चा २) चे कलम ४५-आयए व कलम ४५ - आयसी, अधिसूचना क्र. डीएफसी ११८/डीजी (एसपीटी)९८ दि जानेवारी ३१, १९९८, अधिसूचना क्र. डीएफसी ११९/डीजी(एसपीटी)-९८ दि जानेवारी ३१ १९९८, हे सर्व, अधिसूचना क्र. डीएफसी ११८/डीजी (एसपीटी)९८ दि जानेवारी ३१, १९९८च्या परिच्छेद २(१) (१२) मध्ये व्याख्या केलेल्या, सार्वजनिक ठेवींचा स्वीकार न करणाऱ्या किंवा धारण न करणाऱ्या, तसेच सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडीया अधिनियम, १९९२ (१९९२ चा १) च्या कलम १२ खाली पंजीकरण प्रमाणपत्र मिळविलेल्या तसेच एक व्हेंचर कॅपिटल कंपनी असलेल्या अबँकीय वित्तीय कंपनीला लागु होणार नाही.

## २(६) विमा/स्टॉक एक्सचेंज/स्टॉक ब्रोकर/सब ब्रोकर

भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या क्लम ४५ - आयए, ४५-आयबी, ४५-आयसी, ४५-एमबी आणि ४५-एमसी च्या तरतुदी अधिसूचना क्र. डीएफसी/११८ डीजी(एसपीटी)-९८ दि जानेवारी ३१, १९९८ मध्ये दिलेले, अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेशच्या तरतुदी, 'अबँकीय वित्तीय (ठेवी स्वीकाणाऱ्या व धारण करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स निदेश, २००७,' अधिसूचना क्र. डीएफसी. ११८/डीजी(एसपीटी)-९८ दि जानेवारी ३१, १९९८ च्या परिच्छेद २ (१) (१२) मध्ये व्याख्या केलेल्या, सार्वजनिक ठेवी न स्वीकारणाऱ्या किंवा धारण न करणाऱ्या कोणत्याही अबँकीय वित्तीय कंपनीला आणि -

अ) विम्याचा व्यवसाय करणारी [८] तसेच विमा अधिनियम, १९३८ (१९३८ चा ४) च्या कलम ३ खाली दिलेले वैध पंजीकरण प्रमाणपत्र धारण करणारी आणि-

ब) स्टॉक एक्सचेंज असलेली व सिक्युरिटीज कॉंट्रॅक्ट्स (विनियमन) अधिनियम १९५६(१९५६ चा ४२) च्या कलम ४ खाली मान्यता असलेली अशा अबँकीय वित्तीय कंपनीला लागु होणार नाही.

क) स्टॉक ब्रोकर किंवा सर्ब स्टॉक ब्रोकरचा व्यवसाय करणारी तसेच, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया अधिनियम, १९९२(१९९२ चा १५) च्या कलम १२ खाली वैध पंजीकरण प्रमाणपत्र धारण करणारी आणि-

## २(७) निधी कंपन्या [९]

भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५-आयए, ४५-आयबी, आणि ४५-आयसीच्या तरतुदी पुढील कोणत्याही अबँकीय वित्तीय कंपनीला लागु होणार नाहीत.

अ)निधी कंपनी म्हणून ओळखली जाणारी, कंपनीज अधिनियम १९५६(१९५६ चा१) च्या कलम ६२० अ खाली आणि [१०][अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक निदेश) खाली, अधिसूचित झालेली कंपनी १९९८ एखाद्या म्युच्युअल बेनिफिट वित्तीय कंपनीला किंवा म्युच्युअल बेनिफिट कंपनीला लागु होणार नाही.

मात्र त्याबाबत भारत सरकारने, कंपनीज़ अधिनियम १९५६ (१९५६ चा १) च्या तरतुदीखाली त्या म्युच्युअल बेनिफिट कंपनीचा अर्ज फेटाळला नसला पाहिजे]

**चिट कंपन्या**

ब) चिट फंड्स अधिनियम, १९८२ (१९८२ चा ४०) च्या कलम २ च्या खंड (ब) खाली व्याख्या केलेली चिट्स व्यवसाय करणारी कंपनी.

[७]अधिसूचना क्र. डीएनबीएस.१६३/सीजीएम(सीएसएम)-२००२ ह्यासह वाचित डीएनबीएस (पीडी) सीसीक्र .२२/०२.५९/ २००२-०३ दि. नोंव्हेंबर २८, २००२

[८]अधिसूचना क्र. डीएनबीएस १६४/सीजीएम(सीएसएम)-२००३ सह वाचित डीएनबीएस.(पीडी).सीसी. क्र. २३/०१.१८/२००२-२००३ दि जानेवारी ८, २००३

[९]अधिसूचना क्र. डीएनबीएस १६४/सीजीएम(सीएसएम)-२००३ सह वाचित डीएनबीएस.(पीडी).सीसी. क्र. २३/०१.१८/२००२-२००३ दि जानेवारी ८, २००३'

[१०]अधिसूचना क्र. डीएनबीएस १९७/सीजीएम(पीके)-२००७ दि. नोव्हेंबर २२, २००७ अधिसूचना क्र.१९७ दि नोव्हेंबर २२, २००७ अन्वये स्थापित

**सिक्युरिटायझेशन व रिकन्स्ट्रक्शन कंपन्या**[११]
क) सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनानशियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम २००२ च्या कलम ३ खाली भारतीय रिझर्व बँकेकडे पंजीकृत झालेली सिक्युरिटायझेशन कंपनी किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनी,

**मॉर्गेज गॅरंटी कंपन्या** [१२]
भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५-आय (एफ) (३) खाली, भारत सरकारच्या पूर्वमंजुरीने अधिसूचित असलेली मॉडगेज गॅरंटी कंपनी आणि मॉर्गेज गॅरंटी कंपन्यांच्या पंजीकरण योजनेखाली ह्या बँकेकडे पंजीकृत झालेली कंपनी.

**ई) कोअर इन्वेस्टमेंट कंपन्या** [१३]

(१) ह्या अधिनियमाच्या कलम ४५-आयएच्या तरतुदी, कोअर इन्वेस्टमेंट कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, २०११ च्या परिच्छेद ३ च्या उपपरिच्छेद (१)च्या खंड (ह) मध्ये व्याख्या केलेली, सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट कोअर इन्वेस्टमेंट कंपनी नसलेल्या परंतु कोअर इन्वेस्टमेंट कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, २०११ मध्ये संदर्भित एक कोअर इन्वेस्टमेंट कंपनी असून, एक अबँकीय वित्तीय कंपनीला लागु होणार नाहीत.

२) ह्या अधिनियमाच्या कलम ४५-आयएच्या तरतुदी, कोअर इन्वेस्टमेंट कंपन्या (रिझर्व बँक) निदेशामध्ये व्याख्या केलेली सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट कोअर इन्वेस्टमेंट कंपनी असलेल्या एखाद्या अबँकीय वित्तीय कंपनीला लागु होणार नाहीत. मात्र त्यासाठी ह्या निदेशामधील भांडवली आवश्यकता व लिव्हरेज रेशोचे पालन झालेले असावे.

३) [१४] 'अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणाऱ्या व धारण न करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २०११, कोअर इन्वेस्टमेंट कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, २०११ (ह्यानंतर ह्याला सीआयसी निदेश म्हणण्यात आले आहे) मध्ये संदर्भित असलेली एक कोअर इन्वेस्टमेंट कंपनी तसेच ह्या सीआयसी निदेशांच्या परिच्छेद उच्चा उपपरिच्छेद (१) च्या खंड (ह) मध्ये व्याख्या केलेली सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट कोअर इन्वेस्टमेंट कंपनी नसलेल्या एखाद्या अबँकीय वित्तीय कंपनीला लागु होणार नाहीत.'

४) ह्या निदेशांच्या परिच्छेद १५, १६ व १८ मधील तरतुदी, सीआयसी निदेशांमध्ये व्याख्या केलेल्या सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट कोअर इन्वेस्टमेंट कंपनीला लागु होणार नाहीत. मात्र त्यासाठी, या सीआयसी निदेशांमध्ये विहित केलेल्या भांडवली आवश्यकता व लिव्हरेज रेशोचे पालन झाले असले पाहिजे.

[११] अधिसूचना क्र. डीएनबीएस. ३/सीजीएम (ओपीए)-२००३ दि ऑगस्टद्य २८, २००३.

[१२] अधिसूचना क्र. डीएनबीएस. .(एमजीसी) २/सीजीएम(पीके)-२००८ सह वाचित डीएनबीएस.(पीडी)(एमजीसी) सीसी के १११/ ०३.११.००१/२००७-०८ दि जानेवारी १५, २००८.

[१३] **अधिसूचना क्र. डीएनबीएस. (पीडी) २२०/सीजीएम(युएस)-२०११ दि जानेवारी ५, २०११ अन्वये प्रतिस्थापित**

[१४] **अधिसूचना क्र. डीएनबीएस. (पीडी) २२१/ सीजीएम(युएस)- २०११ दि जानेवारी ५, २०११ अन्वये प्रतिस्थापित**

**परिशिष्ट**

| अनु.क्र. | आधिसूचना क्र. | दिनांक |
|---|---|---|
| १. | आधिसूचना क्र. डीएफसी(सीओसी) क्र.११२ ईडी(एसजी)/९७ ह्यासह वाचित परिपत्रक डीएफसी(सीओसी) क्र. ४४३८/०२.०४/९६-९७ | जुन १८, १९९७ |
| २. | आधिसूचना क्र. डीएफसी १२३/ईडी(जी)-९८ | फेब्रुवारी ३, १९९८ |
| ३. | आधिसूचना क्र.१३४,१३५,१३८/सीजीएम(व्हीएसएनएम)-२००० ह्यासह वाचित डीएनबीएस .(पीडी).सीसी.क्र.१२/०२.०१/९९-२००० | जानेवारी १३, २००० |
| ४. | आधिसूचना क्र.१६३/सीजीएम (सीएसएम)-२००२ ह्यासह वाचित डीएनबीएस.(पीडी).सीसी.क्र.२२/०२.५९/२००२-०३ | नोव्हेंबर २८, २००२ |
| ५. | आधिसूचना क्र.१६४/सीजीएम(सीएसएम)-२००३ ह्यासह वाचित डीएनबीएस .(पीडी).सीसी क्र.२३/०१.१८/२००२-०३ | जानेवारी ८, २००३ |
| ६. | आधिसूचना क्र.डीएनबीएस ३/सीजीएम (ओपीए)-२००३ | ऑगस्ट २८,२००३ |
| ७. | आधिसूचना क्र.डीएनबीएस.१९७/सीजीएम (पीके)-२००७ दिनांक नोव्हेंबर २२, २००७ | नोव्हेंबर २२, २००७ |
| ८. | आधिसूचना क्र.डीएनबीएस.(एमजीसी)२/सीजीएम (पीके)-२००८ ह्यासह वाचित डीएनबीएस (पीडी)( एमजीसी )सीसी क्र.१११/०३.११.००१/ २००७-०८ | जानेवारी १५, २००८. |
| ९. | आधिसूचना क्र .डीएनबीएस.(पीडी)२२०/सीजीएम (युएस)-२०११ | जानेवारी ५, २०११ |
| १० | आधिसूचना क्र. डीएनबीएस .(पीडी) २२१/सीजीएम (युएस)-२०११ जानेवारी ५, २०११ | जानेवारी ५, २०११ |